# मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत

# येशूचा जन्म




**लेखक:** Edward Hughes
**रेखाचित्रकार:** M. Maillot
**अनुवादक:** christian-translation.com
**रूपान्तरकार:** E. Frischbutter; Sarah S.


60 गोष्टींतील 36 (पहिली)


**www.M1914.org**

***Bible for Children,*** *PO Box 3, Winnipeg, MB R3C 2G1 Canada*



परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्ट विकत नाहीत, तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.


मराठी

Marathi








“हे कसे शक्य आहे?” आश्चर्यचकीत झालेल्या तरूणीने विचारले. “मी आजपर्यंत कोणत्याही पुरूषासमवेत राहिलेली नाही.” देवदूताने मेरीला सांगितले की हे मूल ईश्वराकडून येणार. त्याचा पिता कोणी मनुष्य असणार नाही.
3


देवदूताने मग मेरीला सांगितले की तिची चुलत बहिण इलिझाबेथला तिच्या म्हातारपणी मूल होणार होते. हा सुद्धा एक चमत्कारच होता.
4


लवकरच, मेरीने इलिझाबेथची भेट घेतली. त्यांनी दोघींनी मिळून ईश्वराची प्रार्थना केली.
5


मेरीचे योसेफ नावाच्या एका माणसाशी लग्न ठरले होते. योसेफला जेव्हा समजले की मेरीला मूल होणार आहे, तेव्हा तो दुः खी झाला. त्याला वाटले की कोणी दूसरा पुरूष त्या मुलाचा पिता आहे.
6


ईश्वराच्या देवदूताने स्वप्नात येऊन योसेफला सांगितले की हे मूल ईश्वराचे आहे. येशूचे पालन करण्यासाठी योसेफ मेरीला मदत करणार होता.
7


योसेफने ईश्वरावर विश्वास ठेवला व त्याची आज्ञा मानली. त्याने त्याच्या देशाचे कायदेही पाळले.
8


नवीन कायद्यामुळे त्याने व मेरीने कर चुकता करण्यासाठी त्यांची मातृभूमी बेथलहेमकडे प्रयाण केले.
9
मेरी आता मूलाला जन्म देण्यासाठी तयार होती. पण योसेफला कोठेही खोली मिळाली नाही. सर्व धर्मशाळा भरल्या होत्या.
10
शेवटी योसेफला एक गोठा सापडला.  तिथेच बालक येशूचा जन्म झाला.  त्याच्या मातेने त्याला गोठ्यातील गव्हाणीत ठेवले, जिथे सामान्यतः जनावरांना खाण्यासाठी अन्न ठेवले जाते.
11
जवळच, मेंढपाळ त्यांच्या झोपलेल्या मेंढ्यांचा कळप राखत होते.  ईश्वराचा देवदूत प्रकट झाला व त्याने त्यांना ही गोड बातमी सांगितली.
12
"आज डेविडच्या ह्या शहरात तुमच्यासाठी तुमच्या तारणहाराने, येशू ख्रिस्ताने जन्म घेतला आहे.  तुम्हांला ते मूल गव्हाणीत विसावलेले सापडेल."
13
अकस्मात, आणखीही तेजस्वी देवदूत ईश्वराची प्रार्थना करत प्रकट झाले व म्हणू लागले, ...
14


... "परमात्मा परमेश्वराचा जयजयकार असो, आणि पृथ्वीवर शांती वसो, मानवाचे कल्याण होवो."
15
मेंढपाळ लगबगीने गोठ्याकडे गेले. मूल पाहून ते त्यांना भेटणा-या सर्वांना देवदूताने त्यांना येशूबद्दल जे सांगितले ते सांगू लागले.
16
चाळीस दिवसांनंतर योसेफ आणि मेरी येशूला जेरूसलेमच्या मंदिरात घेऊन आले. तिथे शिमोन नावाच्या एका माणसाने मूलासाठी ईश्वराची प्रार्थना केली, तसेच प्रभूची अन्य एक सेविका म्हातारी एनाने आभार मानले.
17
दोघांनाही माहित होते की येशू ईश्वराचा पुत्र - वचनबद्ध तारणहार आहे. योसेफने दोन पक्षांचा बळी दिला. ईश्वराच्या कायद्यानुसार, गरीब जनतेने प्रभूपाशी त्यांचे नवजात मूल घेऊन येताना आणावयाची ही भेट होती.
18
काही काळानंतर एका विशेष ता-याने पूर्वेकडील देशीच्या विद्वानांना जेरूसलेमचा रस्ता दाखविला.
"यहुद्यांचा राजा म्हणून जन्माला आलेला तो कोठे आहे?" त्यांनी विचारले. "आम्हांला त्याची पूजा करायची आहे."
19
राजा हेरोदने त्या विद्वानांविषयी ऐकले. त्रासून त्याने त्या विद्वानांना सांगितले की जेव्हा त्यांना येशू सापडेल तेव्हा त्यांनी त्याला कळवावे. "मला सुद्धा त्याची पूजा करायची आहे." हेरोद म्हणाला. पण तो खोटे बोलत होता. हेरोद येशूला ठार मारण्यास पाहत होता.
20













येशूचा जन्म

ईश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

प्राप्त झाली आहे

मॅथ्यू 1-2, ल्यूक 1-2

"आपल्या वाणीतून आल्यास प्रकाश देते."
प्लाज्म 119:130

ईश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मृत्यू आहे.

ईश्वर आमच्यावर इतके प्रेम करतो की क्रॉसवर मरण्यासाठी आणि आमची शिक्षा भोगण्यासाठी त्याने आपल्या पुत्राला येशूला पाठविले. येशू पुन्हा जिवंत झाला आणि स्वर्गात परत गेला! आता ईश्वर आमच्या पापांसाठी क्षमा करू शकतो.

जर तुम्ही तुमच्या पापांपासून मुक्ती मिळवू इच्छिता, तर ईश्वराला हे सांगा: प्रिय ईश्वरा, येशू माझ्यासाठी मेला आणि आता पुन्हा जगतो आहे यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांसाठी मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल आणि नंतर मी कायम तुझ्याबरोबर राहीन. तुझे मूल होऊन तुझ्यासाठी जगण्यास मला मदत कर. आमेन. जॉन 3:16

बाइबल वाचा आणि ईश्वराशी रोज बोला!